www.a2zSubjects.com

# PAPER-III
# MARATHI

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ____________________________

   (Name) ____________________________

2. (Signature) ____________________________

   (Name) ____________________________

OMR Sheet No. : ..............................................

(To be filled by the Candidate)

Roll No. | | | | | | | | |

(In figures as per admission card)

Roll No.________________________________

(In words)

**D 3 8 1 4**

Time : 2 1/2 hours]

[Maximum Marks : **150**

Number of Pages in this Booklet : **12**

Number of Questions in this Booklet : **75**

## Instructions for the Candidates

1. Write your roll number in the space provided on the top of this page.
2. This paper consists of seventy five multiple-choice type of questions.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to you. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as below :
   (i) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal and do not accept an open booklet.
   (ii) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to pages/questions missing or duplicate or not in serial order or any other discrepancy should be got replaced immediately by a correct booklet from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given.**
   (iii) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each item has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** (A) (B) ● (D)
   where (C) is the correct response.
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done in the end of this booklet.
8. If you write your Name, Roll Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means such as change of response by scratching or using white fluid, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return the test question booklet and Original OMR Sheet to the invigilators at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry original question booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table etc., is prohibited.**
12. **There is no negative marks for incorrect answers.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. इस पृष्ठ के ऊपर नियत स्थान पर अपना रोल नम्बर लिखिए ।
2. इस प्रश्न-पत्र में पचहत्तर बहुविकल्पीय प्रश्न हैं ।
3. परीक्षा प्रारम्भ होने पर, प्रश्न-पुस्तिका आपको दे दी जायेगी । पहले पाँच मिनट आपको प्रश्न-पुस्तिका खोलने तथा उसकी निम्नलिखित जाँच के लिए दिये जायेंगे, जिसकी जाँच आपको अवश्य करनी है :
   (i) प्रश्न-पुस्तिका खोलने के लिए उसके कवर पेज पर लगी कागज की सील को फाड़ लें । खुली हुई या बिना स्टीकर-सील की पुस्तिका स्वीकार न करें ।
   (ii) **कवर पृष्ठ पर छपे निर्देशानुसार प्रश्न-पुस्तिका के पृष्ठ तथा प्रश्नों की संख्या को अच्छी तरह चैक कर लें कि ये पूरे हैं । दोषपूर्ण पुस्तिका जिनमें पृष्ठ/प्रश्न कम हों या दुबारा आ गये हों या सीरियल में न हों अर्थात् किसी भी प्रकार की त्रुटिपूर्ण पुस्तिका स्वीकार न करें तथा उसी समय उसे लौटाकर उसके स्थान पर दूसरी सही प्रश्न-पुस्तिका ले लें । इसके लिए आपको पाँच मिनट दिये जायेंगे । उसके बाद न तो आपकी प्रश्न-पुस्तिका वापस ली जायेगी और न ही आपको अतिरिक्त समय दिया जायेगा ।**
   (iii) इस जाँच के बाद OMR पत्रक की क्रम संख्या इस प्रश्न-पुस्तिका पर अंकित कर दें ।
4. प्रत्येक प्रश्न के लिए चार उत्तर विकल्प (A), (B), (C) तथा (D) दिये गये हैं । आपको सही उत्तर के वृत्त को पेन से भरकर काला करना है जैसा कि नीचे दिखाया गया है ।
   **उदाहरण :** (A) (B) ● (D)
   जबकि (C) सही उत्तर है ।
5. प्रश्नों के उत्तर **केवल प्रश्न पुस्तिका के अन्दर दिये गये OMR पत्रक पर ही** अंकित करने हैं । यदि आप OMR पत्रक पर दिये गये वृत्त के अलावा किसी अन्य स्थान पर उत्तर चिह्नांकित करते हैं, तो उसका मूल्यांकन नहीं होगा ।
6. अन्दर दिये गये निर्देशों को ध्यानपूर्वक पढ़ें ।
7. कच्चा काम (Rough Work) इस पुस्तिका के अन्तिम पृष्ठ पर करें ।
8. यदि आप OMR पत्रक पर नियत स्थान के अलावा अपना नाम, रोल नम्बर, फोन नम्बर या कोई भी ऐसा चिह्न जिससे आपकी पहचान हो सके, अंकित करते हैं अथवा अभद्र भाषा का प्रयोग करते हैं, या कोई अन्य अनुचित साधन का प्रयोग करते हैं, जैसे कि अंकित किये गये उत्तर को मिटाना या सफेद स्याही से बदलना तो परीक्षा के लिये अयोग्य घोषित किये जा सकते हैं ।
9. आपको परीक्षा समाप्त होने पर प्रश्न-पुस्तिका एवं मूल OMR पत्रक निरीक्षक महोदय को लौटाना आवश्यक है और परीक्षा समाप्ति के बाद उसे अपने साथ परीक्षा भवन से बाहर न लेकर जायें । हालांकि आप परीक्षा समाप्ति पर मूल प्रश्न-पुस्तिका तथा OMR पत्रक की डुप्लीकेट प्रति अपने साथ ले जा सकते हैं ।
10. **केवल नीले/काले बाल प्वाईंट पेन का ही इस्तेमाल करें ।**
11. **किसी भी प्रकार का संगणक (कैलकुलेटर) या लाग टेबल आदि का प्रयोग वर्जित है ।**
12. **गलत उत्तरों के लिए कोई नकारात्मक अंक नहीं हैं ।**



www.a2zSubjects.com

www.a2zSubjects.com

# MARATHI
# मराठी
## Paper – III
## प्रश्नपत्रिका – III

**Note :** This paper contains **seventy five (75)** objective type questions of **two (2)** marks each. **All** questions are compulsory.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत विविध पर्याय असलेले **75 (पंचाहत्तर)** प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन (2) गुण** आहेत. **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

**1.** पुढील शिलालेख कालक्रमानुसार लावा.
(A) अक्षी शिलालेख, कुडल शिलालेख, आंबे शिलालेख, भांदक शिलालेख
(B) भांदक शिलालेख, आंबे शिलालेख, कुडल शिलालेख, अक्षी शिलालेख
(C) आंबे शिलालेख, कुडल शिलालेख, अक्षी शिलालेख, भांदक शिलालेख
(D) कुडल शिलालेख, आंबे शिलालेख, भांदक शिलालेख, अक्षी शिलालेख

**2.** “नवल वर्तले, नवल-वर्तले, नवल गुरुचे पायीं ।
कापुर जळूनि गेला तेथे काजळी उरली नाही ।।”
हा अभंग कोणाचा ?
(A) मुक्ताबाई (B) सोयराबाई
(C) जनाबाई (D) निर्मळा

**3.** ‘कृष्णकौतुक’ या काव्याचा लेखक कोण ?
(A) निरंजनमाधव (B) विठ्ठल कळपूरकर
(C) आनंदतनय (D) रघुनाथ शेष

**4.** ‘मेजर वॉकर रेसिडेंट गुजरात’ च्या आज्ञेने तयार झालेले बखरलेखन कोणते ?
(A) भोसले वंश चरित्र (B) गंगाधरशास्त्री पटवर्धन यांचे आत्मचरित्र
(C) श्री शिवाजी प्रताप (D) साष्टीचीं बखर ऊर्फ वसईचा दुर्धर धर्मसंग्राम

**5.** काव्यरचना आणि कवी यांच्या जोडया लावा.

| | |
|---|---|
| a. राधाविलास | i. मोरोपंत |
| b. सन्मनोरथराजी | ii. धुंडीराज |
| c. गोपीचंदाख्यान | iii. कृष्णानंदनिमग्न |
| d. प्रल्हादचरित्र | iv. जनार्दन |
| | v. चिंतामणी |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | v | ii | iii | iv |
| (B) | iv | v | ii | i |
| (C) | ii | iii | i | iv |
| (D) | iii | i | v | ii |



www.a2zSubjects.com

www.a2zSubjects.com

6. ‘कल्पवृक्षाच्या छायेत’ आणि ‘मोहोर’ या कथासंग्रहांचे लेखक कोण आहेत ?
(A) वि.स. सुखटणकर
(B) बा.द. सातोस्कर
(C) लक्ष्मणराव सरदेसाई
(D) जयवंतराव सरदेसाई

7. पु.शि. रेगे यांचे काव्यसंग्रह कालक्रमानुसार लावा.
(A) फुलोरा, हिमसेक, दुसरा पक्षी, प्रियाळ
(B) हिमसेक, दुसरा पक्षी, प्रियाळ, फुलोरा
(C) फुलोरा, दुसरा पक्षी, हिमसेक, प्रियाळ
(D) प्रियाळ, फुलोरा, हिमसेक, दुसरा पक्षी

8. ‘इडा पिडा टळो’ या नाटकाच्या लेखिका कोण आहेत ?
(A) शिरीष पै.
(B) मालतीबाई बेडेकर
(C) सई परांजपे
(D) ज्योत्स्ना देवधर

9. वसाहतकालीन परिस्थिती आणि वर्तमानकालीन वास्तव यांचे अनुबंध तपासू न पाहणारी कोणती कादंबरी; या दोन्ही कालखंडांचे अर्थनिर्णयन करण्याचा प्रयत्न करते ?
(A) रंगनाथ पठारे यांची ‘रथ’
(B) दीनानाथ मनोहर यांची ‘मन्वंतर’
(C) अनिल दामले यांची ‘गौतमची गोष्ट’
(D) श्याम मनोहर यांची ‘कळ’

10. व्यक्तिपर ललितलेखन आणि लेखक यांच्या जोडया लावा.

| | |
|---|---|
| a. शुभ्र काही जीवघेणे | i. अनिल अवचट |
| b. सोयरे सकळ | ii. शांता शेळके |
| c. आप्त | iii. सुनीता देशपांडे |
| d. इतस्ततः | iv. विद्याधर पुंडलीक |
| | v. अंबरीश मिश्र |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | i | iii | ii | iv |
| (B) | ii | i | iv | v |
| (C) | iv | ii | i | iii |
| (D) | v | iii | i | ii |

11. ऐतिहासिक भाषाभ्यासामध्ये कोणती संकल्पना केंद्रवर्ती आहे ?
(A) तुलना
(B) परिवर्तन
(C) सामाजिकता
(D) उत्क्रांती

12. भाषा आत्मसात होणे म्हणजे काय ?
(A) भाषेचा व्यवहारात उपयोग करता येणे
(B) भाषिक संरचनेचे सहजज्ञान होणे
(C) भाषेच्या गाभ्याचे आकलन होणे
(D) ध्वनी व अर्थ यांची सांगड घालता येणे

13. स्वनिमाची अर्थविभेदकता कशाला म्हणतात ?
(A) दोन शब्द अर्थदृष्टया वेगळे ठेवण्याला
(B) दोन स्वनांमधील वैधर्म्ययुक्त विनियोगाला
(C) स्वनांमधील पूरक विनियोगाला
(D) स्वनान्तरांच्या परस्परभिन्न उच्चारणाला



www.a2zSubjects.com

**14.** थोर साहित्यिक, सामाजिक बांधिलकी, ठळक बातमीं, माननीय अध्यक्ष या शब्दप्रयोगांतून कोणत्या प्रकारचा अर्थ व्यक्त होतो ?

(A) प्राप्त अर्थ (B) साहचर्यपर अर्थ
(C) भावपर अर्थ (D) शैलीगत अर्थ

**15.** एका विशिष्ट भौगोलिक मर्यादेत अनेक प्रकारच्या स्थानिक किंवा वर्गीय भेदांनी आणि रूपांनी आपल्या नजरेसमोर येते ती वास्तव पण अमूर्त तात्त्विक विनिमय शक्ती म्हणजे काय ?

(A) बोली (B) भाषा
(C) मातृभाषा (D) प्रमाणभाषा

**16.** चष्मा, झापड, लवलव, विटणे हे शब्द कोणत्या बोलीतील आहेत ?

(A) हळबी (B) डांगी
(C) अहिराणी (D) वऱ्हाडी

**17.** अद्य > अज्ज > आज, पर्ण > पण्ण > पान, हस्त > हत्त > हात – या परिवर्तनप्रक्रियेस काय म्हणतात ?

(A) वर्णव्यत्यास (B) वर्णलोप
(C) वर्णागम (D) वर्णादेश

**18.** गिरी (मुत्सद्देगिरी), दाणी (अत्तरदाणी), दार (दमदार) यांसारखे परसवर्ण मराठीने कोणत्या भाषेतून आत्मसात केले ?

(A) उर्दू (B) अरबी
(C) हिंदी (D) फारसी

**19.** मराठीतील चमचा, जांभूळ, झटकन, झरा या शब्दांचे दन्तमूलीय उच्चार कोणत्या भाषेतून आले असावेत ?

(A) तमिळ (B) तेलुगू
(C) मल्याळम (D) गुजराती

**20.** निजभाषा आत्मसात होण्याची प्रक्रिया घडत असताना लहान मूल जी भाषा वापरते, ती काही प्रौढांच्या भाषेसारखी नसते; प्रौढांच्या भाषेच्या नियमांनुसार बालभाषा ही 'चुकी'ची भाषाच म्हणावी लागेल.

(A) संपूर्ण विधान बरोबर (B) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
(C) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक (D) संपूर्ण विधान चूक

**21.** लौकिक अर्थाला अलौकिकाच्या पातळीवर नेणाऱ्या शक्तीला काय म्हणतात ?

(A) आस्वादक्षमता (B) प्रज्ञा
(C) भावना (D) प्रतिभा

**22.** दीप्त, ललित, मध्यम अशा वर्णनीयाला योग्य अशा पद्यात आस्वाद्य होणारे गुणसाकल्य म्हणजें काय ?

(A) रस (B) रीती
(C) कविता (D) प्रतिष्ठा

**23.** सुखदुःखवादी काव्यमीमांसकांनी 'सुखदुःखात्मको रसः' असे सांगणाऱ्या कोणत्या दोन लेखकांच्या बंडखोरीचे कौतुक केले आहें ?

(A) भामह-दंडी (B) रूद्रट-लोल्लट
(C) विश्वनाथ-विश्वेश्वर (D) रामचंद्र-गुणचंद्र



www.a2zSubjects.com

www.a2zSubjects.com

**24.** कोणते निमित्त 'लक्षणे'चे नाही ?
(A) मुख्यार्थबाध (B) मुख्यार्थयोग
(C) रूढी आणि प्रयोजन (D) संकेत

**25.** लक्षणांनी कशाचे वैचित्र्य साधते, असे भट्टतौताचे मत आहे ?
(A) वक्रोक्तीचे (B) अलंकारांचे
(C) परमार्थाचे (D) नाट्यधर्माचे

**26.** संहितेच्या अर्थाचे स्वरूप आणि अर्थनिर्णयनाच्या शक्यता व मर्यादा यांच्याविजयीचे विवेचन कोणी केले ?
(A) उबर्तो एको (B) मार्टिन हायडेगर
(C) इ.डी. हर्ष (D) हॅन्स रॉबर्ट

**27.** कलाकृतीत सौंदर्येतर मूल्यांची (जीवनमूल्यांची) एकात्म संघटना गतिशील व कल्पकतापूर्ण असेल तर तेथे सौंदर्यमूल्याची निर्मिती होते.
(A) प्रभाकर पाध्ये (B) रा.भा. पाटणकर
(C) सुरेन्द्र बारलिंगे (D) गंगाधर पाटील

**28.** पुढील समीक्षाग्रंथ प्रकाशनकालानुसार लिहा
(A) पासंग, पोत, साहित्यविचार, टीकाविवेक (B) टीकाविवेक, पोत, पासंग, साहित्यविचार
(C) पोत, साहित्यविचार, पासंग, टीकाविवेक (D) साहित्यविचार, टीकाविवेक, पोत, पासंग

**29.** पुढीलपैकी कोणता ग्रंथ मार्क्सवादी समीक्षादृष्टीतून लिहिलेला नाही ?
(A) संत मंडळाचे ऐतिहासिक कार्य (B) साहित्य आणि समाजजीवन
(C) भारतीय संस्कृती (D) सृष्टी, सौंदर्य आणि साहित्यमूल्य

**30.** साहित्यकृतीची भाषा दोन प्रकारचे कार्य करते. एक, विचारविनिमयाचे व अर्थसंप्रेषणाचे आणि दोन, काव्यात्म व सौंदर्यात्म. हा विचार कोणी मांडला ?
(A) मुकॅरोव्हस्की (B) मार्टिन हायडेगर
(C) गादमर (D) देरिदा

**31.** ग्रामीणकथेचे व्यवच्छेदक लक्षण कोणते ?
(A) ग्रामीण भाषा (B) ग्रामीण समस्या
(C) ग्रामीण वातावरण (D) ग्रामीण विनोद

**32.** प्रयोजन गंभीर पण, अभिव्यक्ती पोरकट वाटू शकेल अशा नाट्यप्रकाराला काय म्हणतात ?
(A) सुखांतिका (B) विनोदी नाटक
(C) फार्स (D) वग

**33.** कोणाच्या मृत्यूसंबंधीचे काव्य ही 'विलापिका' होणार नाही ?
(A) बालपणी मातेचा मृत्यू (B) तरुणपणी पतीचा मृत्यू
(C) वृद्धापकाळी पुत्राचा मृत्यू (D) तरुणपणी पत्नीचा मृत्यू



www.a2zSubjects.com

www.a2zSubjects.com

**34.** चरित्रलेखनात कोणत्या बाबीकडे डोळेझाक करता येत नाही ?
(A) वस्तुस्थिती
(B) वास्तवातील व्यक्तींची भाषणे
(C) चरित्रनायकाने मुलाखतीत मांडलेली भूमिका
(D) खुसखुशीतपणा

**35.** 'महानुभाव पंथाने मराठीचा, देशी भाषेचा, बहुजनांच्या बोलीचा पुरस्कार करुन ब्रह्मविद्येला मुकणाऱ्या 'म्हातारियां' ची सोयकेली.' – या विधानातील 'म्हातारियां' ची म्हणजे कोणाची ?
(A) सर्वसामान्य वृद्धांची
(B) सर्वसामान्य लोकांची
(C) सर्वसामान्य अनुभवी लोकांची
(D) बहुजनसमाजातील लेखकांची

**36.** "नियतकालिक लेखापासून जे स्वार्थ होतात, ते आम्हांस सांप्रतचे राजांचे द्वारे माहीत झाले. जा जा देशामध्ये अशे लेखांचा प्रचार झाला आहे, तेथे तेथे लोकांचे आंतर व्यवहारांमध्ये तसेच बाह्य व्यवहारांमध्ये शाश्वत हीत झाले आहे." – हा अभिप्राय कोणी व्यक्त केला ?
(A) बाळशास्त्री जांभेकर
(B) गोपाळ हरि देशमुख
(C) दादोबा पांडुरंग तर्खडकर
(D) भाऊदाजी लाड

**37.** "आता युरोपियन लोकांत व आपले लोकांत धर्मसंबंधी भेद तो कोणता राहिला आहे ?" – असा प्रश्न कोणी विचारला ?
(A) ताराबाई शिंदे
(B) पंडिता रमाबाई
(C) सावित्रीबाई फुले
(D) रमाबाई रानडे

**38.** विधवा पुनर्विवाहाचा कायदा कोणत्या वर्षी झाला ?
(A) 1862
(B) 1874
(C) 1856
(D) 1859

**39.** विनायक बाळकृष्ण दामले यांच्या 'अवलिया' या कादंबरीला एक निखालस सामाजिक कादंबरी म्हणून बरेच वरचे स्थान द्यावे लागेल; तसेच कादंबरीच्या पहिल्या पिढीत स्वभावलेखन आणि मनोविश्लेषण यांना इतके महत्त्व देणारी ही बहुशः एकुलती-एक कादंबरी म्हटले तरी चालेल.
(A) संपूर्ण विधान बरोबर
(B) संपूर्ण विधान चूक
(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

**40.** "पुनर्विवाह अवश्य आहे, असे दाखविणे होते तर, मुख्य पायावरचा तो प्रसंग चमत्कारक रीतीनें टाळला आहे ! मुख्य पायावर तो प्रसंग आणून पुनर्विवाह करविला असता, तर उद्देश विशेष सफल झाला असता. व्यभिचारी स्त्रियांना पुनर्विवाह पाहिजे, असे दाखविण्यांत फारसे पुनर्विवाह शास्त्राचे महत्त्व राहात नाही."
(A) रघुनाथशास्त्री शंकरशास्त्री अभ्यंकर लिखित 'स्वैरसकेशा'
(B) गो.ना. माडगावरकरलिखित 'लहानसा व्यवहार-उपयोगी नाटकरूप निबंध'
(C) महादेव बाळकृष्ण चितळेलिखित 'मनोरमा'
(D) विनायक जनार्दन कीर्तनेलिखित 'जयपाळ'

**41.** पुढीलपैकी कोणता घटक वाङ्मयीनअभिरूचीशी संबंधित नाही ?
(A) महान व्यक्तींचे वाङ्मयीन व्यक्तिदर्शन
(B) विदग्ध साहित्याचे वाचन
(C) लेखक-प्रकाशकयांची प्रतिष्ठा
(D) सत्य-सौजन्य सौंदर्य या मूल्यांचा पुरस्कार



www.a2zSubjects.com

www.a2zSubjects.com

**42.** “इतके श्रम जे केले ते फक्त लोकांस त्यांची वास्तविक स्थिती कशी आहे ती कळावी, त्यांनी सुधारावे, त्यांस इहलोकी सुखवृद्धी व्हावी, परलोकांचे साधन घडावे, व आपले बहुत काळापासून दृढग्रह झाले आहेत, .. ते कमी व्हावे किंवा नाहीसे व्हावे.” – हा उद्देश ठेवून कोणी लेखन केले ?

(A) डॉ. बाबासाहेब आंबेडकर (B) गोपाळ हरि देशमुख

(C) विनायक दामोदर सावरकर (D) ताराबाई शिंदे

**43.** “पुर्नविवाह ब्राह्मणांतच होत नाही असे नाही. दुसऱ्या अवांतर परभू, शेणवी, गुजराथी, भाटे, मारवाडी, मऱ्हाठे, देसाई, देशमुख, इनामदार, जहागीरदार, शिरके, महाडीक, जाधव, भोसले, माने असे अनेक आडनावांचे सोलापूर, सातारा, पुणे ग्वाल्हेर, इंदूर या प्रांती असे मराठे मऱ्हाठ - शाईला मरतात त्या त्यांचे कुळात तर ब्राह्मणापेक्षांही पुर्नविवाह न होण्याची सक्ती दिसून येते. या लोकांचे घराण्यात तर प्राणांती असे बोलणार नाही” असे मत प्रकटन कोणी केले आहे ?

(A) ताराबाई शिंदे (B) पंडिता रमाबाई

(C) विनायक दामोदर सावरकर (D) गोपाळ हरि देशमुख

**44.** “मूळ प्रकृती म्हणजे भारतीय आर्यत्व न सांडता, या पाश्चिमात्य नवीन शिक्षणाचा व त्याबरोबर ज्या नवीन कल्पना येत आहेत त्यांचा आम्ही योग्य रीतीने अंगीकार करीत गेलो, तरच आमचा निभाव लागणार आहे.” – असे मतप्रतिपादन कोणी केले ?

(A) विनायक दामोदर सावरकर (B) गोपाळ हरि देशमुख

(C) गोपाळ गणेश आगरकर (D) विठ्ठल रामजी शिंदे

**45.** अनियतकालिकांची चळवळ निर्माण झाली, कारण

(A) प्रतिष्ठित नियतकालिके नवीन लेखकांना वाव देत नव्हती.

(B) नव्या लेखकांच्या नव्या विचारांसाठी नवे व्यासपीठ निर्माण करणे गरजेचे होते.

(C) नवलेखकांनी स्वीकारलेल्या अस्तित्ववादी भूमिकेचे प्रकाशन निकडीचे होते.

(D) प्रसिद्धीलोलुप लेखकांना माध्यम हवे होते.

**46.** मराठी देवनागरी लिपीतील परिवर्तनाविषयी आग्रही कोण होते ?

(A) सेतुमाधवराव पगडी (B) वासुदेव बळवंत पटवर्धन

(C) माधव त्र्यंबक पटवर्धन (D) बाबाराव सावरकर

**47.** कोणत्या नियतकालिकात वा.ना. देशपांडे आणि आ.रा. देशपांडे यांचे मुक्तछंदविषयक लेखन प्रकाशित झाले ?

(A) प्रतिभा (B) सत्यकथा

(C) मनोरंजन (D) महाराष्ट्र साहित्य पत्रिका

**48.** ‘अक्का’ कोणाला म्हणत ?

(A) कौतिकला (B) श्यामच्या बहिणीला

(C) रामलालच्या आईला (D) मृणालिनीला

**49.** ‘भिंतीवरले नकाशे फडफडल्याने देशात भूकंप होत नसतात’ असे विधान कोणाया साहित्यकृतीत आहे ?

(A) वज्राघात (B) रणांगण

(C) एकच प्याला (D) नटसम्राट

**50.** ‘हाती माती आली’ अशी अनुभूती कोणत्या कवीच्या कवितेत व्यक्त झाली आहे ?

(A) केशवसुत (B) कुसुमाग्रज

(C) मंगेश पाडगावकर (D) केशवकुमार



www.a2zSubjects.com

www.a2zSubjects.com

**51.** लोकसाहित्याची व्याप्ती प्रचंड आहे; त्यात लोकगीते, लोककथा, लोकोक्ती, लोकविधी, लोकनाट्य इ. चा समावेश आढळतो.

(A) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
(B) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक
(C) संपूर्ण विधान चूक
(D) संपूर्ण विधान बरोबर

**52.** 'लोकोक्ती' या प्राचीन तत्त्वज्ञानातील ऱ्हास पावलेल्या व नष्ट झालेल्या भागातील लघुत्वामुळे व अचूकपणामुळे सुरक्षित राहिलेले अवशेष आहेत. हे विधान कोणाचे ?

(A) बेकन
(B) ॲरिस्टॉटल
(C) जॉन विलिगन
(D) हॉवेल

**53.** 'रोडाली' या आदिवासी लोकगीतातून कोणता भाव दृश्यमान होतो ?

(A) थट्टा-मस्करी
(B) मनोरंजन करणे
(C) गप्पा करणे
(D) पूजाविधी करणे

**54.** 'लघुता, व्यावहारिकता, चटकदारपणा आणि लोकमान्यता हे चार गुण म्हणीमध्ये असणे आवश्यक आहे.' हे विधान कोणाचे ?

(A) दुर्गा भागवत
(B) प्रभाकर मांडे
(C) वा.गो. आपटे
(D) रा. चिं ढेरे

**55.** सुन मनी लाडी, सुन मनी लाडी
वनी घुंगरुनी गाडी ।। धृ ।।
वना सासरा लेवाले
मना सासरानी रंगीत गाडी
त्याले म्हातारा बैलेसनी जोडी
वं माडी जाउ दे तथं, मी नही जात
सांग मना सासराले ।। १ ।।
सुन मनी लाडी......
वना जेठ लेवाले
घुंगट कसा खोलू मी
कोना संगे बोलू मी
वं माडी जाउ दे तथं मी नही जात
सांग मना जेठले ।। २ ।।
सुन मनी लाडी......
वना पती लेवाले
मना पतीनी घोडागाडी
वं माडी मी सासरे जास
सांग मना पतीले ।। ३ ।।

वरील लोकगीतातून कोणता मध्यवर्ती आशय प्रकट होतो ?

(A) सासरी जाण्याची ओढ
(B) सासरच्या मंडळींचा तिरस्कार
(C) संसार करण्याची हौस
(D) पतीच्या सहवासाची ओढ



www.a2zSubjects.com

www.a2zSubjects.com

**56.** एकापेक्षा अधिक भाषांमधील साहित्यकृतींची वैधर्म्य, साधर्म्य, प्रभव किंवा प्रभाव यांचा शोध घेत केलेली समीक्षा म्हणजे तौलनिक साहित्याभ्यास होय, ही तौलनिक साहित्याभ्यासाची व्याख्या कोणाची ?

(A) हॅरी लेविन (B) एस.एस. प्रावर

(C) फ्रीड्रिख श्लेगेल (D) एफ.डब्ल्यू. चँडलर

**57.** 'भारत एक आणि अखंड आहे. भारतीय प्रजा नाना भाषा बोलत असेल, पण सर्वांचे हृदय एक आहे', हा विचार कोणी मांडला ?

(A) डॉ. राधाकृष्णन (B) साने गुरुजी

(C) महात्मा गांधी (D) सरोजिनी नायडू

**58.** प्रभाव नेहमीच साक्षात किंवा प्रत्यक्ष असतो असे नाही, तो अप्रत्यक्ष असू शकतो; तसेच तो विखुरलेला, धूसरधूसर होत गेलेला असाही आढळतो.

(A) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक (B) संपूर्ण विधान चूक

(C) संपूर्ण विधान बरोबर (D) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक

**59.** 'भारतीय साहित्याभ्यासकाने भारतीय साहित्याच्या क्षेत्राचा आग्रह धरायचातो देशभक्तीच्या कल्पनेने नव्हे. क्षेत्रमर्यादा कामाच्या दृष्टीने सोयीची असते म्हणून जगातील सर्व महान लेखक आणि महत्त्वाच्या साहित्यिक घडामोडी यांच्या प्रभावासाठी आपल्या स्वागतशील मनाची दारे सदैव उघडीच असावीत.' हा इशारा कोणी दिला ?

(A) बुद्धदेव बोस (B) व्ही.के. गोकाक

(C) प्रो. नगेंद्र (D) अरविंद घोष

**60.** "आपल्या वडिलांच्या वाड्याला असंख्य दालने आहेत ….. या सौंदर्यविश्वात अग्रमान देवतुल्य होमरचा आहे. पण त्याच्या मागोमाग वाल्मीकी, व्यास, फिरदौसी असे आशियातले महाकवीही जरूर आहेत." हा अभिप्राय कोणाचा ?

(A) रेने वेलेक (B) सॅन बव्ह

(C) हिप्पोलीन तेन (D) मॅक्स वेबर

**61.** स्त्रीवादी साहित्याभ्यास मृणजे काय ?

(A) साहित्याच्या सौंदर्यग्रहणाचा ऐतिहासिक विचार

(B) स्त्रीपुरुष साहित्याची तौलनिक चिकित्सा

(C) स्त्रीच्या अस्तित्वाचा शोध घेणाऱ्या साहित्याचा मागोवा

(D) साहित्यातून घडणाऱ्या स्त्रीशोषणाची मीमांसा

**62.** स्त्रीवादी समीक्षेची उपयुक्तता कोणती ?

(A) स्त्रीवादी चळवळीस प्रोत्साहन मिळते. (B) साहित्यातील स्त्रीच्या स्थानाचा बोध घडतो.

(C) स्त्रीसाहित्याच्या संशोधनात भर पडते. (D) रूपवादी समीक्षेचे रूप पालटते.

**63.** स्त्रियांची आत्मचरित्रे ही पुरुषांच्या आत्मचरित्रांपेक्षा आगळीवेगवी वाटतात त्याचे कारण काय ?

(A) जीवनानुभवाचे वेगळेपण (B) लेखनातील प्रांजळपणा

(C) स्त्री विशिष्ट अनुभवांची अभिव्यक्ती (D) पुरुषप्रधान संस्कृतीचा दंभस्फोट



www.a2zSubjects.com

www.a2zSubjects.com

**64.** ग्रंथ व ग्रंथकार यांच्या जोड्या जुळवा :

| | | |
|---|---|---|
| a. | मराठी स्त्री | i. साळूबाई भ्र. तांबवेकर |
| b. | भारतीय स्त्रीजीवन | ii. कृष्णाबाई मोटे |
| c. | चंद्रप्रभा विरहवर्णन | iii. दु.का. संत |
| d. | मीनाक्षीचे स्वप्न | iv. गीता साने |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | iv | i | ii | iii |
| (B) | iii | iv | i | ii |
| (C) | ii | iii | iv | i |
| (D) | i | ii | iii | iv |

**65.** पुढीलपैकी विजया राजाध्यक्ष यांचा कथासंग्रह कोणता ?

(A) ऋणानुबंध
(B) दर्पण
(C) समास
(D) कमान

**66.** ग्रामीण साहित्य रंजनप्रधान आहे; त्यामुळेच त्यामध्ये काल्पनिकता आढळते.

(A) संपूर्ण विधान बरोबर
(B) संपूर्ण विधान चूक
(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
(D) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक

**67.** पुढीलपैकी कोणते लेखन भास्कर चंदनशिव यांचे नाही ?

(A) माती आणि नाती
(B) माती आणि मंथन
(C) भूमी आणि भूमिका
(D) मातीची चूल

**68.** जोडया जुळवा – कवितासंग्रह आणि सनावळी.

| | | |
|---|---|---|
| a. | आलाप आणि विलाप | i. १९६१ |
| b. | रानजाई | ii. १९५५ |
| c. | लिंबोळ्या | iii. १९६० |
| d. | पुन्हा नभाच्या लाल कडा | iv. १९३४ |
| | | v. १९४१ |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | v | iv | i | ii |
| (B) | ii | i | v | iv |
| (C) | iii | ii | iv | i |
| (D) | iv | iii | ii | v |

**69.** र.वा. दिघे यांच्या कादंबऱ्या कालक्रमानुसार लावा.

(A) गानलुब्धा मृगनयना, पाणकळा, रानजाई, सराई
(B) सराई, रानजाई, पाणकळा, गानलुब्धा, मृगनयना
(C) पाणकळा, सराई, रानजाई, गानलुब्धा, मृगनयना
(D) रानजाई, गानलुब्धा, मृगनयना, सराई, पाणकळा



www.a2zSubjects.com

www.a2zSubjects.com

**70.** ‘बळीबा पाटील’ ही कृष्णराव भालेकर यांची कादंबरी कोणत्या नियतकालिकातून क्रमशः प्रसिद्ध झाली ?

(A) दीनमित्र
(B) राष्ट्रवीर
(C) दीनबंधु
(D) विजयी मराठा

**71.** बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केण्हा झाली ?

(A) १९२४
(B) १९२७
(C) १९३०
(D) १९३३

**72.** ‘या बेड्या मी अशा तोडून टाकणार’ असे निर्धाराने सांगणाऱ्या युवकाचे चित्र पुढीलपैकी कोणाया वृत्तपत्राच्या मुखपृष्ठावर आहे ?

(A) बहिष्कृत भारत
(B) प्रबुद्ध भारत
(C) जनता
(D) मूकनायक

**73.** ‘अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम’ हा ग्रंथ कोणी लिहिला ?

(A) डॉ. बाबासाहेब आंबेडकर
(B) यशवंत मनोहर
(C) गंगाधर पानतावणे
(D) शंकरराव खरात

**74.** ‘अस्पृश्यता घालवण्यासाठी संघर्षापेक्षा सामंजस्याची भूमिका घेतली पाहिजे’ या आशयाची मांडणी पुढीलपैकी कोणत्या ग्रंथात आढळते ?

(A) भारतातील जातीभेद आणि त्यावरील उपाय
(B) अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम
(C) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर
(D) दलित साहित्य - आजचे क्रांतिविज्ञान

**75.** जोड्या जुळवा – कवितासंग्रह आणि कवी :

a. प्रज्ञा लोखंडे — i. रक्तखुणा
b. उषा हिंगोणेकर — ii. पत्ता बदलत जाणारा गनीम
c. उत्तम अंभोरे — iii. माझ्या घराचे दार
d. बा.स. हारे — iv. अंतरंग
v. मुद्रालेख

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | v | iv | i | ii |
| (B) | ii | i | v | iv |
| (C) | iv | v | ii | i |
| (D) | i | ii | iii | iv |



www.a2zSubjects.com

www.a2zSubjects.com

**Space For Rough Work**



www.a2zSubjects.com